महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

दैनिक जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ १४ जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३४६ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# मुरबाड मतदार संघातील विकास प्रकल्पांना भरघोस निधी

## मुख्यमंत्र्यांसह आमदार किसन कथोरेंच्या बैठकीत पंधराशे कोटींच्या कामांना मांजरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : आज शुक्रवार दिनांक 13 जून 2025 रोजी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री आदरणीय ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी आमदार किसन कथोरे साहेब यांच्या मागणी नुसार सह्याद्री अतिथीगृह येथे मुरबाड विधानसभा मतदार संघातील खालील प्रमाणे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी तसेच प्रशासकिय मंजुरी व निधी उपलब्ध करून देणेकरिता आढावा बैठकीचे आयोजन केले होते.सदर बैठकीमध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी आढावा घेत सर्व अधिकाऱ्यांना आमदार किसन कथोरे साहेबांनी जे प्रकल्प सागितले आहेत त्या संदर्भात आत्ता पर्यंत काय कार्यवाही केली आहे याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने विषयनिहाय आढावा द्यावा मग मी त्यावर मार्ग सांगतो असे सुचविले त्यानुसार खालीलप्रमाणे प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या त्यामुळे मुरबाड मतदार संघातील खालील प्रकल्प आता पूर्णत्वास येतील.



1) कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील बेलवली कात्रप रेल्वे क्रॉसिंग ओव्हर ब्रिज चे कार्यरंभ आदेश देऊन कामाचा शुभारंभ करणे
2) कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील दत्त चौक बेलवली ते समर्थ चौक बॅरेज रोड पर्यंत रेल्वे लाईनला समांतर ओव्हर ब्रिज बांधणे
3) कांजूरमार्ग ऐरोली शिळफाटा कटाई ते बदलापूर मेट्रो प्रकल्पाच्या निविदा काढल्या आहेत परंतु काम लवकर सुरु करणेबाबत
4) कुशीवली धरणाचे काम सुरु करणे
5) मुरबाड तालुका दिवाणी न्यायालयीन नवीन इमारत बांधकाम करणे
6) उल्हास नदी पूर नियंत्रण रेषा काही अटी व शर्थी शिथिल करून नव्याने पूर नियंत्रण रेषा आखणे
7) मुरबाड तालुक्यातील काळू धरण प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याचे पुनर्वसन करून पॅकेज देणेबाबत
8) जांभूळ उपकेंद्र येथून प्रस्तावित केलेल्या दोन मुख्य उच्चदाब वीज वाहिन्या 220/22 के.व्ही. भूमिगत करणे
9) बदलापूरात स्वतंत्र्य उपकेंद्र आवश्यक असल्याने प्रस्तावित टाटा पॉवर कंपनीचे उपकेंद्रास जागा देऊन मंजुरी देणे
10) कुबनपा हद्दीतील स. न. 35/3/2 खाजगी मिळकतीवरील शाळेच्या बांधकामबाबत
11) इंदगाव, बेंडशील, नंबरवाडी व मामणोली या चार लघु पाटबंधारे प्रकल्पाना MMRDA कडून निधी उपलब्ध करून देणे
12) बदलापूर सॅटिज प्रकल्प
13) बॅरेज रोड ते होप इंडिया रेल्वे ओव्हर ब्रिज ला मंजुरी व निधी देने
14) कुळगाव बदलापूर पूर्व व पश्चिम पोलीस स्टेशन तसेच टोकावडे, कुळगाव ग्रामीण, टिटवाळा ग्रामीण पोलीस स्टेशन नवीन इमारत बांधकाम करून कर्मचारी वसाहतिचे बांधकाम करणे
15) नेवाळी नाका भुयारी बायपास मार्ग मजुरी देणे
16) क्रीडा संकुल विकसित करणे
17) नाट्यगृहाला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देणे.

या व इतर अनेक विषयांवर चर्चा होऊन हे प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याबाबत मा. मुख्यमंत्री आणि संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या

---

### थोडक्यात महत्वाचे



## सरकारी जमिनीच्या सीमांकनाअभावी
# शहापूरातील ग्रामपंचायती मूलभूत सुविधांपासून वंचित

### तात्काळ सीमांकन करून ग्रामपंचायतींना सुविधा द्या
### - मंत्री गणेश नाईकांचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे - शहापूर तालुक्यातील मोखावणे कसारा ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कसारा येथील हद्दीत वन विभाग, महसूल आणि रेल्वे विभागाची जागा आहे. या जागांचे सीमांकन न झाल्याने तेथे रस्ते, विद्युत सुविधा, पाडयांना जोडणाऱ्या पायवाटा यांसारख्या सुविधा अद्याप नसल्याचे अनेकदा समोर आले आहे. मात्र याबाबत स्थानिक प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही केली जात नव्हती. याबाबत ग्रामस्थांनी अनेकदा मागणी देखील केली होती. याची दखल घेऊन वनमंत्री गणेश नाईक यांनी नुकतीच बैठकी घेतली, या बैठकीत त्यांनी या जागांचे ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी लवकरात लवकर खातेफोड करावी. जेणेकरून तेथील ग्रामस्थांना पायाभूत सुविधा देण्यात येतील, असे आदेश दिले. जिल्ह्याच्या शहापूर आणि मुरबाड तालुक्यात मोठ्या प्रमाणात शासकीय जागा आहे. यातील बहुतांश जागा या स्थानिक शेतकरी गेले अनेक दशक राखत असल्याने त्यांच्यात आणि प्रशासनामध्ये वाद देखील याच पद्धतीने कसारा गावात वन विभाग, महसूल आणि रेल्वे विभागाची जागा आहे. या जागांचे सीमांकन न झाल्याने तेथे रस्ते, विद्युत, पाऊलवाट आदी सुविधा देता येत नाहीत. त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात अडचणीचा सामना करावा लागतो. याबाबत वेळोवेळी ग्रामस्थांनी पाठपुरावा देखील केला आहे.

गेले ५० वर्ष ग्रामस्थ या ठिकाणी राहत आहे. मात्र जागांचे सीमांकन न झाल्याने ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षेतेखाली बैठक पार पडली. यावेळी ठाणे जिल्हाधिकारी यांनी तातडीने या जागांची खातेफोड करावे. त्यानंतर या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पायाभूत सुविधा निर्माण करून द्याव्यात. तसेच प्रलंबित वनहक्क दावे तातडीने निकाली काढण्यात यावेत, अशा सूचना देखील यावेळी दिल्या.

# ठाणे जिल्ह्यातील सहाशे अंगणवाड्यांमध्ये शौचालये नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - लहान बालकांचे शैक्षणिक, सामाजिक आणि आरोग्यदृष्ट्या घडणारे पहिले टप्पे म्हणजे अंगणवाड्या. मात्र याच अंगणवाड्यांमध्ये जिल्हा प्रशासनाच्या एका अहवालानुसार ठाणे जिल्ह्यात सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या एकूण ३ हजार ५३८ अंगणवाड्यांपैकी ६०२ अंगणवाड्यांमध्ये शौचालय नसल्याचे उघडकीस आले आहे. यामुळे पायाभूत सुविधा नसल्याने लहान बालकांसह अंगणवाडी सेविकांना देखील अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

ग्रामीण आणि शहरी भागात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सहा वर्षांखालील मुलांचे पोषण आणि आरोग्यस्थिती सुधारणा करण्यासाठी केंद्र आणि राज्य महिला बाल विकास विभाग विविध उपाययोजना राबवित असते. ग्रामीण आणि शहरी भागात या सर्व योजना एकाच ठिकाणाहून राबविण्यासाठी अंगणवाडी उभारण्यात आल्या आहेत. या अंगणवाडींमध्ये कार्यरत असणाऱ्या सेविका आणि मदतनीस यांच्या माध्यमातून बालकांना शिक्षण देण्याबरोबरच दररोज पोषण आहाराचे वाटप केले जाते.

'स्वच्छ भारत अभियान', 'सर्व शिक्षा अभियान' आणि 'बाल विकास प्रकल्प' या सर्व योजना कागदावर दिसतात. परंतु या योजनेचा प्रत्यक्ष परिणाम दिसत नाही. तर अनेक अंगणवाड्या आजही जीर्ण इमारतीत, मर्यादित जागेत आणि सुविधाशून्य अवस्थेत सुरू आहेत. या स्थितीमुळे बालकांचे आरोग्य आणि शिक्षण यावर दीर्घकालीन परिणाम होत आहे. शासन आणि प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे.

---

# जुन्या युतीचा नवा अध्याय ?
## उल्हासनगरात शिंदे कलानी भेटीने चर्चना उधाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : राजकारणात कोण कधी कोणाच्या गोटात जाईल, याचा नेम नसतो; पण जेव्हा निर्णयाच्याच दिवशी दिशा बदलते, तेव्हा नक्कीच राजकीय भूकंपाची चाहूल लागते. १० जून रोजी उल्हासनगरमध्ये असेच काहीसे घडले.

ज्या दिवशी ओमी कलानी यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा अंतिम मानल्या जात होत्या, त्याच दिवशी त्यांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत राजकीय समीकरणाला जबरदस्त वळण दिले. ही भेट केवळ औपचारिक सौजन्य भेट नव्हे, तर शिवसेना (शिंदे गट) आणि कलानी युतीच्या नव्या शक्यता तयार करणारी ठरू शकते.

एकीकडे उल्हासनगरमधील कलानी कुटुंब भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा होती. ओमी पप्पू कलानी यांच्या नेतृत्वाखाली भाजप प्रवेशाची तारीख ठरल्याचेही बोलले जात होते. मात्र, त्या दिवशी म्हणजे १० जून रोजीच ओमी कलानी यांनी थेट महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना (शिंदे गट) चे प्रमुख एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन सर्वांना आश्चर्यचकित केले. ही भेट तातडीने घडवून आणल्याचे सूचक असून, भाजपच्या रणनीतीला या घडामोडीमुळे मोठा झटका बसला आहे.

ही भेट केवळ सौजन्यभेट होती की आगामी महापालिका निवडणुकांसाठी राजकीय रणनितीचा भाग, यावर सध्या कोणताही ठोस खुलासा झाला नसला, तरी या भेटीचे संकेत स्पष्ट आहेत. या भेटीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे प्रवक्ते कमलेश निकम हे देखील उपस्थित होते. ओमी कालानी आणि एकनाथ शिंदे भेटीबाबत प्रवक्ता कमलेश निकम यांना विचारले असता त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. मात्र, कलानी परिवारात कोणीही बोलत नाही, तेव्हाच खूप काही घडत असते असा जुना अनुभव आहे.



कलानी कुटुंब आणि शिवसेना यांच्यातील संबंध नवीन नाहीत. २०१९ मध्ये शिवसेनेचा महापौर उल्हासनगर महापालिकेत सत्तेवर आला, तेव्हा त्या यशामागे कलानी गटाची भूमिका ठळक होती. याच गटाने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना बिनशर्त समर्थनही दिले होते. या पार्श्वभूमीवर पाहता, ओमी कलानी आणि एकनाथ शिंदे यांची भेट ही जुन्या नात्यांची जुळवाजुळव की नव्या गठबंधनाची सुरुवात, हे लवकरच स्पष्ट होईल.

---

# असमाधानकारक नालेसफाई

## आयुक्त अभिनव गोयल यांची कारवाई केडीएमसीतील स्वच्छता अधिकारी निलंबित !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी काल दिवसभरात कल्याण पूर्वेतील 4/जे आणि 5/ड प्रभाग क्षेत्रातील नाले साफ-सफाई व परिसर स्वच्छतेची पाहणी केली. यावेळी शहर अभियंता अनिता परदेशी, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे, उपआयुक्त प्रसाद बोरकर, संजय जाधव, कार्यकारी अभियंता घन:श्याम नवांगुळ, मनोज सांगळे, 4/जे प्रभागाचे सहा.आयुक्त सचिन तामखेडे, 5/ड प्रभागाचे सहा.आयुक्त उमेश यमगर त्यांचे समवेत उपस्थित होते.4/जे प्रभागात आयुक्तांनी लोकग्राम व मंगलराघोनगर या परिसरातील मध्यम नाल्यांची साफ-सफाई व परिसर स्वच्छतेची पाहणी केली. या नाल्यांची 65-70 टक्के साफ-सफाई झाल्याची माहिती प्रभागाचे सहा.आयुक्त सचिन तामखेडे यांनी दिली. पुढील 8 दिवसात प्रभागातील सर्व नाल्यांची साफ-सफाई पुर्ण करण्याच्या सूचना महापालिका आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच नाल्यातून काढलेला गाळ त्वरीत उचलण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.5/ड प्रभागात आयुक्तांनी विजयनगर नाका व तिसगाव पाडा या परिसरात प्रत्यक्ष भेट देवून नाले साफ-सफाई व परिसर स्वच्छतेची पाहणी केली. पाहणी दरम्यान काही ठिकाणी नाले सफाईचे काम असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यामुळे, 5/ड प्रभागातील स्वच्छता अधिकारी राजेंद्र खैरे यांस निलंबित करण्यात आले.नाले सफाई पाहणी पूर्वी महापालिका आयुक्त अभिनव आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली 4/जे आणि 5/ड प्रभागातील आपत्कालीन परिस्थितीतील पूर्व तयारीचा सविस्तर आढावा घेणेकामी, बैठक संपन्न झाली. या बैठकीत धोकादायक व अतिधोकादायक इमारतींची संख्या, त्या इमारतीतून रहिवास मुक्त केलेल्या कुंटूबांची संख्या तसेच अनधिकृत होर्डिंग्ज विरोधातील कारवाई याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

### कर्मचाऱ्यांची कोंडी

आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी सागितले, कल्याण पूर्व भागातील नाले सफाईची कामे एक वर्षाच्या कालावधीसाठी ठेकेदाराला देण्यात आली आहेत. त्यामुळे ठेकेदार मनमानी करून ही सफाई करतो. नाले, गटार सफाई करणारे बहुतांशी ठेकेदार हे राजकीय आशीर्वाद असलेले आहेत. त्यांना काही सूचना केली की ते थेट त्यांच्या नेत्यांना सागतात. मग नेत्यांचे शब्द ऐकावे लागतात. त्यामुळे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची दोन्ही बाजुने कोंडी होत आहे, असे कर्मचाऱ्यांनी नाव न प्रसिध्द करण्याच्या अटीवर सागितले.

### दोन महिन्यात आठ जणांचे निलंबन

आयुक्त अभिनव गोयल यांनी मागील दोन महिन्यापूर्वी पदभार स्वीकारल्यापासून कर्तव्यात कसूरपणा करणाऱ्या एकूण सात कर्मचाऱ्यांना निलबित केले आहे. यामध्ये पालिका रुक्मिणीबाई रुग्णालयातील सहा कर्मचारी, लेखा विभागातील एक लिपिक यांचा यात समावेश आहे. आयुक्तांच्या या कठोर शिस्तीचा कर्मचाऱ्यांनी धसका घेतला आहे










## गीतासार



### अध्याय १३
### क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः

ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना । अन्ये साङ्ख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥ १३-२४ ॥

त्या परमात्म्याला काहीजण शुद्ध झालेल्या सूक्ष्म बुद्धीने ध्यानाच्या योगाने हृदयात पाहातात. दुसरे काहीजण ज्ञानयोगाच्या द्वारा आणि इतर कितीतरी लोक कर्मयोगाच्या द्वारा पाहातात म्हणजेच प्राप्त करून घेतात. ॥ १३-२४ ॥

अन्ये त्वेवमजानन्तः श्रुत्वान्येभ्य उपासते । तेऽपि चातितरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥ १३-२५ ॥

परंतु यांखेरीज इतर अर्थात मंदबुद्धीचे पुरुष आहेत, ते अशाप्रकारे न जाणणारे असतात. ते दुसऱ्यांकडून म्हणजेच तत्त्वज्ञानी पुरुषांकडून ऐकूनच तदनुसार उपासना करतात आणि ते ऐकलेले प्रमाण मानणारे पुरुषसुद्धा मृत्युरूप संसारसागर खात्रीने तरून जातात. ॥ १३-२५ ॥

यावत्सञ्जायते किञ्चित्सत्त्वं स्थावरजङ्गमम् । क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ॥ १३-२६ ॥

हे भरतर्षभा (अर्थात भरतवंशीयांमध्ये श्रेष्ठ अर्जुना), जेवढे म्हणून स्थावर-जंगम प्राणी उत्पन्न होतात, ते सर्व क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगानेच उत्पन्न होतात, असे तू जाण. ॥ १३-२६ ॥

# डोंबिवलीत शिवसेना ठाकरे गटाचा मेळावा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /डोंबिवली : आज गुरुवार रोजी सायंकाळी 5 वाजता डोंबिवलीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून कल्याण शिवसेना जिल्हा प्रमुख दीपेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली आणि शिवसेना नेते,विधानपरिषद सदस्य, ॲड.अनिल परब यांच्या अध्यक्षते खाली येणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदाधिकारी मेळावा आयोजित करण्यात आला.निवडणुकीची तयारी,आणि पुढील रणनीती आखण्यासाठी तसेच पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सदर मेळावा आयोजित करण्यात आला. येणाऱ्या महानगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करून वरिष्ठ पातळीवर काही निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. मनसे आणि शिवसेनेच्या युती संदर्भात स्पष्ट बोलणे ॲड.अनिल परब यांनी तूर्तास टाळले.

# साईराज रिसॉर्टचे
## आ. किसन कथोरेंच्या हस्ते उद्घाटन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : अल्पावधीत उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केलेले ठाणे जिल्ह्यातील युवा उद्योजक संतोषशेठ गोंधळे यांच्या साईराज रिसॉर्ट व मॅरेज लॉन्सचे उद्घाटन गुरुवार दि.12 जुन रोजी सायंकाळी 7 वाजता मुरबाड विधानसभेचे कार्यक्षम आमदार किसन कथोरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

मुरबाड -माळशेज राष्ट्रीय महामार्गावर आंनदवाडी येथे साईराज हॉटेलच्या पाठीमागे मुरबाड तालुक्यातील पहिलेच सर्व सोयीयुक्त भव्य व सुंदर असे रिसॉर्ट,वाटर पार्क व मॅरेज लॉन्स तयार केले आहे. या ठिकाणी येणार्या पर्यटकांना कमीत कमी खर्चात चांगल्या सेवा मिळणार आहेत. स्लाईडींग, रेनडान्स , वाटर पार्क असे अनेक खेळ मनोरंजनासाठी असणार आहेत. त्याच बरोबर राहण्यासाठी दर्जेदार बंगले व रूम उपलब्ध असणार आहेत. विशेष म्हणजे मॅरेज लॉन्स मध्ये तालुक्यातील गरिब, आदिवासी लोकांना अत्यंत कमी भाडे आकारून मॅरेज लॉन्स उपलब्ध करून देणार असल्याचे मालक संतोष गोंधळे यांनी सांगितले. या व्यवसायामध्ये पैसा कमावणे हा आपला उद्देश नसून लोकांचे मनोरंजन व इतर सेवा पुरविणे हा आपला उद्देश असल्याचे सांगितले.

या सुंदर अशा साईराज रिसॉर्टचे दिमाखदार उद्घाटन मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांनी करून संतोष गोंधळे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी तहसीलदार अभिजित देशमुख, टि.डी. सी.बँकेचे उपाध्यक्ष अरूण पाटील, संचालक राजेश पाटील, उल्हास बांगर, दिपक पवार, अनिल घरत, आप्पा घुडे,दिनेश उघडे, सुवर्णा ठाकरे यांच्या सह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

# तीन महिने झाले | भाताचे पैसे नाहीत
## शहापूरातील पंधराशे शेतकरी मोबदल्याच्या प्रतीक्षेत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : तालुक्यातील भात उत्पादक शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. कारण, त्यांनी शासनाच्या अधिकृत खरेदी केंद्रावर धान विक्री करून दोन ते तीन महिने उलटले असतानाही त्यांच्या खात्यात अद्याप पैसे जमा झालेले नाहीत.यावर्षी शासनाने धानाला हमीभाव देत बोनसचीही घोषणा केली होती,त्यामुळे बाजारपेठेच्या तुलनेत अधिक दर मिळेल या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी शासकीय खरेदी केंद्रावर आपले भात पोहोचवले. परंतु या खरेदी प्रक्रियेनंतरही तब्बल १ हजार ५०० शेतकऱ्यांना ना मूळ विक्री रक्कम मिळाली आहे, ना बोनस.परिणामी बियाणे, खते, मशागत यांसाठी लागणारा खर्च करणे शेतकऱ्यांना अशक्य होत चालले आहे.

मे महिन्याच्या सुरुवातीला अवकाळी पाऊस आणि मान्सूनचे आगमन झाल्यामुळे खरिपाच्या हंगामाची तयारी सुरू झाली आहे. मात्र,खात्रीशीर उत्पन्नाच्या अभावी आणि थकीत रक्कम न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था अडचणीत आणणारी झाली आहे. ट्रॅक्टर भाड्याने घेणे, बियाणे खरेदी करणे,खते मिळवणे यासाठी पैशांची नितांत गरज आहे.पण बँकांच्या दारात फेऱ्या मारूनही पैसे मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.यावर्षी शासनाने दोन हेक्टरपर्यंतच्या शेतकऱ्यांसाठी हेक्टरी २० हजार रुपयांचा बोनस जाहीर केला आहे.हमीभाव २ हजार ३०० रुपये प्रतिक्विंटल निश्चित करण्यात आला असून बाजार भावाच्या तुलनेत हा पर्याय नक्कीच चांगला वाटतो.पण जेव्हा मूळ विक्री रक्कमच शेतकऱ्यांना वेळेत मिळत नाही,तेव्हा बोनस फक्त कागदावरच उरतो,अशी भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.शासनाकडून बोनस जाहीर करण्यात आला. परंतु प्रत्यक्षात त्याचा लाभ शेतकऱ्यांच्या हाती केव्हा पडणार याचा काही निश्चित अंदाज नसल्याचे ॲड.प्रशांत घोडविंदे यांनी दैनिक ठाणे वैभवशी बोलतांना सांगितले.

**लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात थकीत रक्कम जमा करावी आणि बोनसही वितरित करावा. अन्यथा खरिपाची तयारी करणे कठीण होईल आणि शेतकरी कर्जबाजारी होण्याच्या मार्गावर जाईल.या वर्षी हवामान बदलामुळे आधीच पीक नुकसान झाले आहे, त्यात शासन वेळेवर पैसे देत नसेल तर शेतकऱ्यांचा शासनावरचा विश्वास पूर्णपणे ढासळेल. त्या मुळे शासनाने आणि संबंधित यंत्रणांनी याची गंभीर दखल घेऊन त्वरित कारवाई करणे अत्यावश्यक.**
**- भगवान सांबरे, भात उत्पादक शेतकरी.**

# ठाणे महापालिका क्षेत्रात अतिसार प्रतिबंध मोहिम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ठाणे : ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 16 जून ते 31 जुलै 2025 या कालावधीत 'अतिसार थांबवा' (STOP Diarrhea Campaign) ही मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत ० ते ५ वर्षांखालील अतिसार बाधित मुलांना ORS पाकिट तसेच Zinc ची गोळी यांचे वाटप आशा कार्यकर्तामार्फत केले जाणार आहे. तसेच अंगणवाडी, आरोग्य केंद्रामधुन ORS घोळ तयार करण्याचे व हात धुण्याची प्रात्याक्षिके केली जाणार आहेत. तसेच संस्था स्तरांवर ORS कॉर्नरची स्थापना करणे, जलशुष्कतेने बधित रुग्णांचे उपचार केले जाणार असून अतिसाराबाबत कोणतीही लक्षणे आढळल्यास नागरिकांनी ठाणे महापालिकेच्या नजीकच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

वैयक्तिक व परिसरातील स्वच्छतेच्या अभावामुळे अतिसार पसरविणा-या जंतूंचा प्रसार होऊन अतिसाराची लागण होते. उघड्यावर शौचास बसणे, उघडयावरील अन्न पदार्थ खाणे, दैनंदिन जीवनात अशुध्द पाण्याचा वापर करणे, जेवणाआधी व शौचानंतर स्वच्छ पाणी व साबणाने हात न धुणे आदी सवयी अतिसाराचा प्रादुर्भाव होण्याकरिता कारणीभुत आहेत. अतिसाराच्या उपचाराकरीता ORS चे घोळ तयार करुन बालकाला दिल्यास शरीरातील जलशुष्कतेचे प्रमाण कमी होते, तसेच क्षारांची कमतरताही भरुन निघते, झिंकची गोळी १५ दिवस दिल्यास जुलाबाची वारंवारता कमी होवून अतिसार लवकर बरा होतो, बाळाला अतिसार किवा जुलाब चालु असताना माता स्तनपान करीत असल्यास स्तनपान सुरु ठेवावे, बाळाला हलके अन्न दयावे, स्वच्छता राखावी, मुलांचे व स्वतःचे हात वारंवार साबणाने धुवावे असे आवाहन ठाणे महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

अतिसार टाळण्याकरिता वैयक्तिक व परिसर स्वच्छता अत्यंत महत्वाची असून त्या करिता उघडयावर शौचाला बसणे टाळावे, पाणी उकळून व गाळून किंवा क्लोरीनचा वापर करुन निर्जंतुक करावे व आजुबाजुचा परिसर स्वच्छ ठेवावा तसेच अतिसाराबाबत लक्षणे आढळल्यास जवळच्या ठाणे महापालिकेच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा असे आवाहन देखील ठाणे महापालिकेच्या आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# मुरबाड : पावसामुळे झाड कोसळून घराचे नुकसान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यात गुरूवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास विजेच्या गडगडासह जोरदार मुसळधार पाऊस बरसल्याने सर्वच ठिकाणी रस्त्यावर तसेच शेतामध्ये पाणीच-पाणी झाल्याचे चित्र दिसून आले.या जोरदार मुसळधार पावसामुळे तालुक्यातील मौजे -आघाशी येथे .१२ जून २०२५ रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घरावर झाड कोसळल्याची घटना घडली आहे.आगाशी येथील रवी शेळके यांच्या राहत्या घरावर झाड पडून घराचे नुकसान झाले आहे .त्यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. या घटनेची माहिती मिळताच मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मुरबाड महसूल खात्यातील तलाठी, सर्कल, कर्मचारी यांनी घटनास्थळी जाऊन पडलेल्या झाड पडलेल्या घराची पाहणी करून पंचनामा करण्यात आला आहे.

# शहापुर वनरक्षक व वनपाल संघटनेच्या अध्यक्षपदी भास्कर डोनरपल्ले



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापुर : महाराष्ट्र राज्य वनरक्षक व पदोन्नत वनपाल संघटना, महाराष्ट्र राज्य वनमजुर कर्मचारी व वनक्षेत्रीय वाहनचालक संघटना,ठाणे यांच्या शहापुर कार्यकारिणीची नुकतीच निवड करण्यात आली असून अध्यक्षपदी भास्कर डोनरपल्ले,सचिव कुणाल जाधव,विक्रम कोळी,कार्याध्यक्ष रामहरी तांबडे,उपाध्यक्ष ऋषिकेश जंगम,चंद्रप्रकाश मोर्या,महिला आघाडीप्रमुख ज्योती फसाळे,कोषाध्यक्ष विशाल खेडकर,सहसचिव पवन राठोड,कैलास मापारी,सल्लागार भाऊराव भांगरे यांची एकमताने निवड करण्यात आली.यावेळी वनमजूर संघटनेच्या अध्यक्षपदी काशीनाथ विशे यांची तर संघटकपदी अनिल वाघ यांची निवड झाली. यावेळी केंद्रीय अध्यक्ष अजय पाटील व कोकण विभाग अध्यक्ष सुनील भोंडवे आदी पदाधिकारी उपस्थित होते.वनविभागच्या कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी कायम प्रयत्न करणार असल्याचे यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष भास्कर डोनरपल्ले यांनी यावेळी सांगितले.

## आरोग्य
### औषधी विड्याचे पान

**शरीराला डिटॉक्सिफाय करते**
नागलीची पाने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतात. सकाळी रिकाम्या पोटी ते प्यायल्याने यकृत आणि मूत्रपिंड स्वच्छ होतात. यामुळे त्वचा स्वच्छ दिसते आणि चेहऱ्यावर चमक येते. हे एक नैसर्गिक डिटॉक्स पेय म्हणून काम करते.

**पचनतंत्र मजबूत करते**
नागलीच्या पानांमध्ये असलेले अँटी-ऑक्सिडंट आणि फायबर गुणधर्म पोटाच्या समस्यांपासून आराम देतात. जर तुम्ही दररोज सकाळी नागलीच्या पानांचे पाणी प्यायले तर गॅस, अपचन आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या कमी होतात. हे पाणी पचन प्रक्रियेला गती देते आणि अन्न चांगले पचण्यास मदत करते.वजन कमी करण्यास उपयुक्त जर तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल तर नागलीच्या पानांचे पाणी तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. ते चयापचय गतिमान करते, ज्यामुळे शरीर अधिक कॅलरीज बर्न करते. ते भूकेवर देखील नियंत्रण ठेवते.

**रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉल नियंत्रित करते**
विड्याची पाने रक्तातील साखरेची पातळी संतुलित ठेवण्यास मदत करू शकतात. मधुमेहाच्या रुग्णांसाठी हे फायदेशीर आहे. यासोबतच ते शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल कमी करते आणि हृदय निरोगी ठेवण्यास मदत करते.

**पाणी कसे बनवाल**
सर्वप्रथम 2 ते 3 नागलीची किंवा विड्याची पाने घेऊन स्वच्छ धुवून घ्या आणि स्वच्छ पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी उठून रिकाम्या पोटी हे पाणी गाळून पिऊन घ्या . दररोज नियमितपणे हे पाणी प्यायल्याने शरीराला फायदे मिळतील.

# क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी एकविध क्रीडा महासंघ आयुक्तांच्या भेटीला



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी खेळाडू केंद्रबिंदू मानून सुधारणा होणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचे स्वतंत्र क्रीडा धोरण झाले पाहिजे, शालेय क्रीडा स्पर्धा या दर्जेदार पद्धतीने झाल्या पाहिजेत तसेच महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांमधील क्रीडा सुप्त गुण हेरून एकविध क्रीडा संघटनेच्या प्रशिक्षकांकडून विनामूल्य मार्गदर्शन करणे अशा विविध विषयांवर चर्चा करण्याकरता ठाणे जिल्हा एकविध क्रीडा महासंघाचे प्रा. उदय नाईक, प्रा. श्रीराम पाटील, प्रा. लक्ष्मण इंगळे, डॉ. यज्ञेश्वर बागराव, प्रताप पगार, संजय काळे, बाळू उबाळे व अंकुर आहेर या प्रतिनिधींनी आयुक्त अभिनव गोयल व क्रीडा उपायुक्त संजय जाधव यांची भेट घेतली.

महाराष्ट्र शासनाच्या २००३ च्या शासन निर्णयानुसार शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये जिल्ह्याचा दर्जा मिळवणारी पहिली महानगरपालिका म्हणून कल्याण डोंबिवली महानगरपालिका ओळखली जाते.ठाणे जिल्ह्यातील सुमारे ५३ शासनमान्य व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची मान्यताप्राप्त एकविध क्रीडा संघटना आप्पासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे जिल्हा एकविध क्रीडा महासंघाच्या माध्यमातून संघटित झाल्या. २०३६ च्या ऑलिम्पिक मध्ये ठाणे जिल्ह्यातील खेळाडू भारताचे प्रतिनिधित्व करतील या उदात्त हेतूने महासंघाने कार्य हाती घेतले आहे. कल्याण डोंबिवली ही क्रीडा क्षेत्रातील पंढरी. कुस्ती, जिमनॅस्टिक, तलवारबाजी, वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग, कबड्डी, आट्या पाट्या, कॅरम अशा देशी विदेशी खेळांमधील शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू याच मातीत घडले. कल्याण डोंबिवली महानगरपालिका ही प्रगत महानगरपालिका असताना आज खेळाडू, क्रीडा शिक्षक व क्रीडा संघटनांना क्रीडा सुविधा नसल्याने अनेक समस्या भेडसावत आहेत. महानगरपालिकेला जिल्ह्याचा दर्जा मिळाल्यावर शासन निर्णयानुसार क्रीडा समिती स्थापन केली होती. परंतु सध्या क्रीडा समिती अस्तित्वात नाही. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महानगरपालिकेचा क्रीडा विभाग यांच्यात समन्वय नाही. अन्य सर्वच महानगरपालिकेत स्पर्धा संपल्यानंतर त्या खेळातील विजयी संघांना पदके दिली जातात. परंतु कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत विजयी खेळाडूंचे कौतुक केले जात नाही याची खंत महासंघाने मांडली. विजयी खेळाडूंची प्रमाणपत्रे ऑनलाईन काढून स्वाक्षरी साठी क्रीडा विभागाकडे क्रीडा शिक्षकांना वारंवार फेऱ्या माराव्या लागतात. या सर्वच कारणांमुळे क्रीडा शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर आहे. परंतु कल्याण डोंबिवली महापालिकेच्या क्रीडा विभागाचे उपायुक्त म्हणून संजय जाधव यांनी पदभार स्वीकारल्यामुळे क्रीडा शिक्षक व एकविध क्रीडा संघटनांनी समाधान व्यक्त केले. उपायुक्त संजय जाधव हे स्वतः खेळाडू असल्याने त्यांना खेळाडूंच्या समस्या माहित आहेत.

शालेय क्रीडा स्पर्धांच्या अनुषंगाने लवकरच सर्व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार आहोत, क्रीडा समितीची रचना सुरु असून क्रीडा समितीची बैठकही घेणार असल्याबाबत संजय जाधव यांनी सांगितले. २०२४-२५ पूर्वी शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये झालेल्या घटनांवर चर्चा न करता यापुढे क्रीडा विभागाकडे काटेकोरपणे लक्ष देवून शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ जास्तीत जास्त चांगल्या पद्धतीने घेणार असे सकारात्मक आश्वासन संजय जाधव यांनी दिले. खेळाडूंना न्याय मिळावा व क्रीडा विभागाच्या माध्यमातून उत्तम व गुणवत्तापूर्ण काम व्हावे यासाठी क्रीडा पर्यवेक्षिकाची जागा भरणार आहोत असे क्रीडा उपायुक्त संजय जाधव यांनी सांगितले.

कल्याण पूर्वेला एकमेव दादासाहेब गायकवाड क्रीडांगण आहे. पावसाळयात या क्रीडांगणावर पाण्याचे डबके तयार होते असे कबड्डी संघटनेचे सहसचिव बाळू उबाळे यांनी निदर्शनास आणून दिली. तेव्हा सर्व क्रीडांगणे सुस्थितीत करण्याचे काम महानगरपालिका करणार असल्याबाबत संजय जाधव यांनी सांगितले.







## आजचे राशिभविष्य



**मेष**
जवळच्या नातेवाईकांच्या आगमनामुळे घरात उत्सवाचे वातावरण असेल. प्रत्येक काम एकाग्रतेने केल्यास यश मिळेल. योजना यशस्वी होतील.

**वृषभ**
तुमचे विशेष काम तुमच्या इच्छेनुसार होणार आहे, त्यामुळे कोणतीही मेहनत कमी करू नका. माहितीपूर्ण साहित्य वाचण्यासाठी वेळ घालवाल.

**मिथुन**
आज कोणतेही महत्त्वाचे काम वेळेवर पूर्ण होईल. विद्यार्थी आज अभ्यासावर लक्ष केंद्रित करतील. तुमच्या मनात अनेक सकारात्मक भावना येतील.

**कर्क**
प्रियकरासाठी दिवस अनुकूल आहे. कोणाशीही वादात पडू नका आणि अहंकारावर नियंत्रण ठेवा. महत्त्वाची उपलब्धी हातून जाऊ शकते.

**सिंह**
योग्य निर्णय घेणे खूप महत्वाचे आहे. तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल जेणेकरुन तुम्हाला हवे ते सर्व साध्य करता येईल. तंत्रज्ञानाचा तुम्हाला फायदा होईल.

**कन्या**
तुमच्या आजूबाजूच्या लोकांमध्ये तुमची चांगली प्रतिमा तयार होईल. तब्येत एकदम ठीक राहील. आई-वडिलांच्या आरोग्याबाबत चिंतेत असाल.

**तूळ**
आपल्या खर्चात उदार होऊ नका आणि इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नका, यामुळे तुमच्या जीवनात शांतता येईल.घरातील मोठ्यांचा सल्ला जरूर घ्या.

**वृश्चिक**
तुम्हाला चांगला सल्ला मिळेल. भावनेच्या भरात आज कोणालाही वचन देऊ नका. आज तुम्ही फालतू खर्चापासून दूर राहून योग्य बजेट सांभाळा.

**धनु**
नवीन काम सुरू करण्यासाठी योग्य वेळेची वाट पहा. तुम्ही तुमच्या मनात काहीतरी विचार कराल. आर्थिक बाबतीतही पूर्णपणे सावध राहा.

**मकर**
व्यवसायातील तुमच्या योजना आणि कार्यपद्धती आज कोणाला सांगू नका.रागावर नियंत्रण ठेवा. तुमच्या आर्थिक परिस्थितीचे मूल्यांकन कराल.

**कुंभ**
तुमच्या मनात नकारात्मक विचार येऊ देऊ नका. म्ही बहुतेक बाबतीत भाग्यवान समजाल. आज तुम्ही कुटुंबीयांसह खरेदी इत्यादीमध्ये व्यस्त असाल.

**मीन**
भावांसोबत सुरू असलेले मतभेद मिटतील आणि नात्यात पुन्हा गोडवा येईल. आजचा काळ अनुकूल आहे.तुम्हाला मित्राकडून आर्थिक मदत मिळेल.

# कष्टानं हवाई सुंदरी झाली ; पण नियतीनं घात केला

## गुजरात विमान अपघातात डोंबिवलीकर तरुणीचा मृत्यू



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** गुजरातच्या अहमदाबादमध्ये झालेल्या भीषण विमान दुर्घटनेत डोंबिवलीकर 27 वर्षीय रोशनी सोनघरे हिचा दुर्दैवी मृत्यू झाला. एअर इंडियाच्या अपघातग्रस्त विमानामध्ये रोशनी फ्लाइट क्रू म्हणून कार्यरत होती. रोशनीच्या मृत्यूने तिच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पंधरा वर्षांपूर्वी म्हणजेच 22 मे 2010 रोजी मंगळूर एअरपोर्टवर असाच विमान अपघात झाला होता आणि या विमान दुर्घटनेत सुद्धा डोंबिवलीची एक तरुणी तेजल कामुलकरवर काळाने घाला घातला होता. कालच्या अहमदाबाद विमान दुर्घटनेतील डोंबिवलीच्या रोशनी सोनघरे च्या दुःखद बातमीने दुर्दैवी तेजल कामुलकरची आठवण आली.

अहमदाबाद येथे झालेल्या भीषण विमान दुर्घटनेत डोंबिवलीकर २७ वर्षीय रोशनी सोनघरे हिचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. एअर इंडियाच्या अपघातग्रस्त विमानामध्ये रोशनी फ्लाइट क्रू म्हणून कार्यरत होती. रोशनी ही डोंबिवली पूर्वेकडील राजाजी पथ परिसरातील नव उमीया कृपा सोसायटी मध्ये आपल्या आई-वडिल आणि भाऊ सोबत राहत होती.

मिळालेल्या माहितीनुसार, रोशनीचे वडील राजेंद्र आई राजश्री आणि भाऊ विघ्नेश हे एकत्रच राहत होते. मुंबई ग्रांट रोड परिसरात राहणारे हे कुटुंब दोन वर्षांपूर्वी डोंबिवलीत स्थायिक झाले होते. रोशनी हिचा भाऊ विघ्नेश हा एका खाजगी शिपिंग कंपनीमध्ये काम करतो तर आई-वडील हे घरीच असतात. रोशनीचे शिक्षण मुंबईत झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राजेंद्र सोनघरे आणि त्यांचे पत्नी राजश्री हिने आपल्या दोन्ही मुलांना शिकवले.

रोशनीचे शिक्षण व्ही.बी.एम. मॉडेल हायस्कूल ग्रांट रोडला झाले आहे. त्यानंतर ती भारती कॉलेजला होती. ती मग अंधेरीला केबिन क्रूचे शिक्षण घेतले. ती आधी स्पाइस जेटमध्ये कार्यरत होती. लॉकडाऊनमध्ये काही काळ घरी राहिली. त्यानंतर एअर इंडियामध्ये रुजू झाली होती. तिला फिरण्याची आवड होती. तसेच सोशल मीडियावरही अॅक्टीव्ह होती. या प्रोफेशनमध्ये जाण्यास वडिलांचा विरोध होता. पण आईने पाठिंबा दिला होता. ही घटना समजल्यानंतर तिची आई राजश्री येथे आहे. तसेच तिचे वडील आणि भाऊ अहमदाबादला रवाना झाले आहे.



# काळाने हिरावला बदलापूरचा 'दीपक'

## अहमदाबाद विमान दुर्घटनेत बदलापूरचे सहवैमानिक दीपक पाठक यांचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** अहमदाबाद येथे एअर इंडियाच्या गुरुवारी दुपारी झालेल्या विमान दुर्घटनेत सहवैमानिक बदलापुरातील दीपक पाठक यांचा मृत्यू झाला आहे. या विमान दुर्घटनेचे वृत्त कळताच दीपकच्या मित्रपरिवाराने त्याच्या निवासस्थानी धाव घेतली आहे.

अहमदाबाद-लंडनला अपघातातील सहवैमानिक दीपक पाठक हा बदलापुरात राहणारा होता. या विमान दुर्घटनेबाबत समजताच दीपकच्या बदलापुर पूर्वेकडील कात्रप परिसरातील रावल कॉम्प्लेक्स या निवासस्थानी त्याच्या मित्रांनी गर्दी केली आहे. त्यांना दुःख अनावर झाले आहे. या घटनेनंतर त्याच्या घरी मित्रपरिवाराची गर्दी झाली आहे.

विमान टेक ऑफ करण्यापूर्वी दुपारी दीपकचे त्याच्या आईशी फोनवरून बोलणे झाले होते. त्यानंतर कुटुंबातील कोणाचाही दीपकशी संवाद झालेला नाही. दीपक हा गेल्या ११ वर्षांपासून एअर इंडियात नोकरीला होता. त्याच्या कुटुंबात दोन विवाहित बहिणी, आई, वडील आणि तो असा त्यांचा परिवार आहे.



# उल्हासनगर महानगर पालिकेच्या नगररचना विभागाला आयएसओ प्रमाणपत्र

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर -** शंभर दिवसांच्या कृती आराखड्यात कार्यालयाचा कायापालट करून सर्वेक्षण करण्यासाठी आलेल्या शासनाच्या समितीकडून कौतुकाची पोचपावती मिळवणाऱ्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने आयएसओ प्रमाणपत्राला गवसणी घातली आहे.

प्रमाणपत्र मिळवण्यात सिंहाचा वाटा उचलणारे सहायक संचालक नगररचना ललित खोब्रागडे व त्यांच्या टीमचे महानगरपालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी आज गुरुवारी महासभा सभागृहात जाहीर सत्कार केला आहे.

नगररचना विभागातील कामकाजाला गती मिळण्यासाठी सहायक संचालक नगररचना ललित खोब्रागडे यांनी आधीचा जो डेव्हलपमेंट प्लॅन समजण्यात अडचण येत होती. ती दूर करण्याकरिता विशेष प्रशिक्षणचे आयोजन केले.

त्यामुळे सिटी सर्वेच्या सीट्स व डेव्हलपमेंट प्लॅन यांचा ताळमेळ बसला. प्लॅन नागरिकांना समजावा याकरिता नगररचना विभागाच्या बाहेर स्क्रीन झळकवण्यात आली. बांधकाम परवाना कमी वेळेत मंजूर व्हावा व त्यात पारदर्शकता असावी यासाठी ऑनलाइन बिल्डिंग प्लॅन मॅनेजमेंट प्रणाली सुरू केली.

संपूर्ण रेकॉर्ड हा आयएसओ मानकामध्ये बसावा यासाठी सर्व जुन्या फाईलींचे वर्गीकरण करून रेकॉर्ड रूम अद्यावत केले. त्यानंतर लोकसेवा हक्क कायद्यानुसार सर्व प्रक्रिया समाधानपूर्वक सुरू केल्या. पहिल्यांदा नगररचना विभागासाठी सॉफ्टवेअर तयार करण्यात आले.

महानगरपालिकेला शंभर दिवसांच्या कृती आराखड्यात प्रथम क्रमांक व आयुक्त मनीषा आव्हाळे यांना सर्वोत्तम आयुक्त म्हणून घोषित करण्यापूर्वी शासनाच्या समितीने उल्हासनगर महानगरपालिकेचा आढावा घेऊन सर्वेक्षण केले होते. त्यावेळी समितीने नगररचना विभागाने जो कायापालट केला त्याचे कौतुक केले होते.

यासंदर्भात सहायक संचालक नगररचना ललित खोब्रागडे यांच्याशी विचारणा केली असता, आयएसओ प्रमाणपत्र मिळणे हे टीमवर्कचे फलित आहे. आम्ही आयुक्त मनीषा आव्हाळे यांचे मार्गदर्शन व सूचनांची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी केली.

### आरसीएफची खत उत्पादन प्रक्रिया बंद

# पालघर जिल्ह्यात खतांचा तुटवडा

**खत पुरवठ्यावर परिणाम झाल्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय**

**खताचा पुरवठा मर्यादित झाल्यामुळे साठेबाजीची शक्यता**

**खतांचा साठा उपलब्ध करून देण्यासाठी आरसीएफ कंपनीच्या रायगड जिल्ह्यातील थळ येथील कारखान्यातून खतपुरवठा सुरु करण्याची मागणी पालघर जिल्ह्यातील शेतकरी आणि कृषी सेवा केंद्रचालकांकडून केली जात आहे. तसेच, तात्पुरता खतपुरवठा वाढवण्यासाठी अन्य स्रोतांचा विचार करावा, असेही सागितले जात आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मनोर, ता. 13 (बातमीदार) :** आरसीएफच्या चेंबूर येथील कारखान्यातून खताची उत्पादन प्रक्रिया बंद झाल्यामुळे पालघर जिल्ह्यात खतांच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. खरीप हंगामातील पेरणीच्या काळात खतपुरवठ्यावर परिणाम झाल्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे. जिल्ह्यातील मोठे वितरक लहान वितरकांना खत उपलब्ध करून देत नसल्याने कृषी सेवा केंद्रावर भात बियाणे खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांनाच खत उपलब्ध करून दिले जात आहे. खताचा पुरवठा मर्यादित झाल्यामुळे साठेबाजीची शक्यता वर्तवली जात आहे.

पालघर जिल्ह्यातील लहान वितरक असलेल्या कृषी सेवा केंद्राची मागणी आरसीएफ कंपनीच्या प्रतिनिधीमार्फत स्वीकारली जात नसल्याची माहिती नाव न सांगण्याच्या अटीवर कृषी सेवा केंद्राच्या मालकाने दिली. बफर स्टॉकमधील खत उपलब्ध करून देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

आरसीएफचा चेंबूर येथील युरिया व संमिश्र खत निर्मितीचा कारखाना तांत्रिक बिघाडामुळे बंद आहे. त्याचा खत निर्मितीवर परिणाम झाल्याने आरसीएफकडून राज्यभरात होणाऱ्या खतपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीची वेळ येऊन ठेपली आहे. अशात शेतकऱ्यांना वेळेवर खत मिळणे गरजेचे आहे. खताअभावी पेरणी केलेल्या पिकांची वाढ बाधित होऊन उत्पादनावर परिणाम होण्याची भीती पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

### आज ठाण्यात

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नव्या कार्यालयाचे उद्घाटन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे - श्रीराम व्यायाम शाळा सेवा संस्था, ठाणे यांच्यावतीने गणेश पूजन तसेच कार्यालय प्रवेश या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची ठाण्यातील पहिली शाखा म्हणुन हे कार्यालय ओळखले जाते. त्यामुळे एका अर्थाने संघाच्या नव्या कार्यालयाचे उद्या उद्घाटन होत आहे.

या कार्यक्रमाला प्रांत संघचालक अर्जुन यशवंत तथा बाबा चांदेकर यांची उपस्थिती असणार आहे. हा कार्यक्रम शनिवार, १४ जुन रोजी सायंकाळी ४ ते रात्री ९ यावेळेत डॉ. मूस मार्ग, नाना-नानी उद्यानासमोर, तलावपाळी, ठाणे (प) येथे होणार आहे.

या कार्यक्रमाचे गणेश पुजन सायंकाळी ४ वाजता होणार आहे. त्यानंतर कार्यालयाचे दर्शन घेता येणार आहे. तसेच सायंकाळी ६ वाजता प्रांत संघचालक अर्जुन यशवंत तथा बाबा चांदेकर आणि प्रांत कार्यवाह विठ्ठल दुधप्पा कांबळे यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे. त्याचबरोबर ते उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

ठाण्यात १९२५-३० या कालावधीत श्रीराम व्यायाम शाळा सेवा संस्था या व्यायामशाळेची उभारणी करण्यात आली होती. या संस्थेला एक सामाजिक, शैक्षणिक आणि राष्ट्रीय मूल्यांवर आधारित संस्था म्हणून ओळखले जाते. संस्थेच्यावतीने नियमित व्यायाम, भारतीय खेळ, योग साधना, महिला व युवक सशक्तीकरण तसेच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते.

# नेवाळी - काटई दैनंदिन वाहतूक कोंडीने वाहनचालक बेजार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः-** नेवाळी ते काटई दरम्यानचा प्रवास म्हणजे आज एक मानसिक परीक्षा ठरत आहे. कर्मचाऱ्यांना कामावर, विद्यार्थ्यांना शाळेत, तसेच नागरिकांना इतर महत्त्वाच्या ठिकाणी वेळेत पोहोचण्यासाठी जीवाच्या आकांताने आज वाट काढावी लागत आहे. अवघ्या १०-१५ मिनिटांत पूर्ण होणारा हा प्रवास आज पुन्हा एकदा पाऊण ते एक तास घेत असल्याने सर्व वाहनचालकांकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. तर अनेक वाहनचालकांनी खोणी चौक येथे आपली गाडी सोडून पुढे जाऊन दुसऱ्या गाड्यांनी प्रवास केला आहे.

आज सकाळपासूनच या मार्गावर वाहनांची लांबच लांब रांग लागलेली आहे. हजारो वाहनचालक ताटकळत रस्त्यावर उभे आहेत. या भीषण वाहतूक कोंडीमुळे अनेकांनी ऑफिस वेळा चुकवल्या, शाळेतील पालक मुलांना उशिराने सोडत असल्याचे चित्र दिसून येत आहे. या मार्गावर खोणी चौकात भीषण वाहतूक कोंडी झाली आहे. तर याच शेजारी असलेल्या माढा वसाहतीच्या समोरच मोठाले खड्डे असल्याने या वाहतूक कोंडीत अधिक भर पडत आहे. या कोंडीचे चित्र काही आजचेच नाही, पण आजचा दिवस मात्र विशेष त्रासदायक ठरत आहे. "या मार्गावरून प्रवास म्हणजे दररोज सकाळचे युद्ध" अशी प्रतिक्रिया वाहतूक कोंडीत अडककेले प्रवासी देत आहेत.






# जि. प. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून भिवंडी तालुक्यातील विकासयोजनांचा आढावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे/दि. १३** – जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी दि. १२ जून, २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील विविध गावांना भेट देऊन विकास योजनांची अंमलबजावणी, अडचणी व गरजा यांचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

प्राथमिक आरोग्य कोन (ता. भिवंडी) येथील आरोग्य केंद्राच्या इमारतीची पाहणी करण्यात आली. सद्यस्थितीत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन पर्यायी जागेची पाहणीही करण्यात आली. नवीन आरोग्य केंद्र उभारण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तत्काळ सादर करण्याच्या सूचना त्यांनी आरोग्य व ग्रामपंचायत विभागाला दिल्या. दरम्यानच्या कालावधी मध्ये पर्यायी इमारतीची पाहणी केली व अनुषंगिक सुचना केल्या.



या भेटीदरम्यान गोवे व ओवळी या ग्रामपंचायतींमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा दोन अंतर्गत "आवास प्लस सर्वेक्षण" शून्य नोंद असलेल्या गावांचा समावेश असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी या गावांना भेट देऊन ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. योजनेबाबत सविस्तर माहिती घेतली आणि लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात यावी, याबाबत स्पष्ट सूचना दिल्या. भिवंडी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी अशाच पद्धतीने प्रत्यक्ष भेटी देऊन पुनश्च खात्री करावी आणि अहवाल तालुका स्तरावर सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट निर्देश दिले की, लाभार्थ्यांना योजनेत समाविष्ट होण्याची ही शेवटची संधी आहे. कोणताही पात्र लाभार्थी सर्वेक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी ग्रामस्थ, सरपंच, उपसरपंच व ग्रामविकास अधिकारी यांनी एकत्रितपणे गावात लाभार्थी शिल्लक नाही याची खात्री करून घ्यावी. लाभार्थी आढळल्यास त्यांची नोंद पुढील दोन दिवसांत तात्काळ करण्यात यावी.

खोणी, काटई व खांबे या गावांना भेट देऊन थकीत पाणीपट्टी संदर्भात बैठक घेण्यात आली. यावेळी फ्लो मीटर आणि वॉटर मीटरची पाहणी करण्यात आली. सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ व स्टेम अधिकाऱ्यांच्या समवेत चर्चा करून थकीत पाणीपट्टीची वसुली तातडीने करण्यात यावी, अशा सूचना दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या या दौऱ्यामुळे ग्रामस्तरावर योजनांच्या अंमलबजावणीला गती मिळणार असून, थेट संवादातून नागरिकांच्या अडचणी वेळेत सोडविण्यासाठी मदत होणार आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ कोणाला मिळणार ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /ठाणे : सामाजिक न्याय व विशेष विभागाच्या अंतगर्त ठाणे जिल्हयातील मुलांची -4 व मुलींची-4 अशी एकूण-8 शासकीय वसतिगृहे कायर्रत आहेत. या वसतिगृहांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवगर् व इतर मागास प्रवगार्तील रिक्त असलेल्या जागांवर सन 2025-26 या शैक्षणिक वषार्करीता प्रवेश देण्यासाठी महाआयटी पोटर्ल सुरू करण्यात आले आहे.

सन 2025-26 या शैक्षणिक वषार्करीता ठाणे जिल्हयातील मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहातील शालेय, कनिष्ठ /वरीष्ठ महाविद्यालय तसेच व्यावसयिक / बिगर व्यावसयिक अभ्यासक्रम जसे की, बी.ए.बी. कॉम. / बी.एस.सी, पदवीका / पदवी आणि पदवीनंतरचे पदव्युत्तर पदवी, पदवीका इत्यादी अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्याथ्यार्ंनी ऑनलाईन प्रवेश या पोटर्लवर अजर् केल्यानंतर रिक्त जागांवर निकषानुसार प्रवेश देण्यात येईल. विशेष म्हणजे या पोटर्लवर वसतिगृहासाठी प्रवेश मिळावा म्हणून अजर् केला असेल तरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ विद्याथ्यार्ंना मिळणार आहे. वसतिगृहासाठी ऑनलाइन पोटर्लवर अजर् केला आणि वसतिगृहात प्रवेश न मिळाल्यास त्यांना पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा अजर् करण्याची गरज नाही. विद्याथ्यार्ंना आपोआप वसतिगृहात प्रवेश न झाल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकडे विद्याथ्यार्ंची नोंद होईल. त्यानंतर त्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळेल.अडचण वाटत असेल तर मागरदशर्न घ्या...त्यानुसार ठाणे जिल्हयातील मुला/ मुलीच्या शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्याथ्यार्ंनी https://hmas.mahait.org प्रस्तुत लिंकचा वापर करून अजर् भरावे, काही अडचण उद्भवल्यास स्थानिक गृहप्रमुख, गृहपाल यांच्याकडे संपकर् साधून प्रवेश अजर् भरावेत, असे आव्हान, समाज कल्याण ठाणे सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

# मोटारसायकली चोरणारा गजाआड

## एक लाखाच्या सहा मोटारसायकली जप्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहर परिसरातील विविध रस्त्यावर उभ्या केलेल्या मोटारसायकली चोरणाऱ्या अट्टल चोरट्यांस भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनावणे यांच्या विशेष पोलीस पथकाने मोठ्या शिताफीने तपास करीत अटक करून त्याच्या कडून एक लाख 77 हजार रुपये किमंतीचे 6 मोटारसायकली जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.सदर आरोपीवर मुंबई,कल्याण भिवंडी सह विविध ठिकाणी गुन्हे दाखल.

भिवंडी शहरातील नारपोली पोलीस ठाण्याचे हद्दीत मोटरसायकल चोरीचे प्रकार घडत असल्याने नारपोली व भिवंडी गुन्हे शाखेचे पोलीस समांतर तपास करीत असताना गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनावणे यांच्या पथकास मोटारसायकल चोरा बाबतीत माहिती मिळाल्याने त्याच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराज माळी,धनराज केदार,पोहवा सुनिल साळुंके,निलेश बोरसे, साबीर शेख,रंगनाथ पाटील,किशोर थोरात,राजेश गावडे, सुदेश घाग,अमोल इंगळे,माया डोंगरे,सायली गंभेरा या पोलीस पथकाने ठाणे मुब्रा येथील इमरान पठाण चाळ परिसरात सापळा रचून संशयित आरोपी रजाउल नदीम अख्तर अंसारी (वय २४ वर्षे, रा. आझाद नगर मुंब्रा,जि.ठाणे) यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांने भिवंडी, कल्याण व मुंबई अशा विविध पोलीस ठाण्याचे हद्दीत मोटारसायकली चोरी केल्याचे तपासात उघड झाले त्यामुळे पोलिसांनी त्यांच्या कडून सुमारे एक लाख 77 हजार रुपये किमंतीचे 6 मोटारसायकली पोलिसांनी जप्त केले आहेत. सदर आरोपीने विविध शहरात मोटारसायकली चोरल्याचे उघड झाले असुन गुन्हे दाखल आहेत. पुढील तपास नारपोली व गुन्हे शाखेचे पोलीस करीत आहेत.

# ठाणे जिल्ह्यात प्रत्येक शाळेत आर एस पी पथक तयार करावे

## - उपायुक्त पंकज शिरसाट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : वर्षभरात प्रत्येक आर एस पी अधिकारी शिक्षक यांनी आपल्या शाळेत किमान दोन पथक तयार करून महिन्यातून दोन दिवस पद कवायत, वाहतूक इशारे याविषयी प्रॅक्टिकल करुन घ्यावे व जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत RSP पथक तयार करण्यात यावे. यासाठी वाहतूक विभागाकडून कोणतीही मदत लागली तर ती करण्यात येईल. तसेच जिल्ह्यातील प्रशिक्षित आरएसपी अधिकारी शिक्षकांची माहिती देखील पोलीस विभागाचे वेबसाईटवर ऑनलाइन देण्यात येईल. असे ठाणे शहर वाहतूक पोलिस उपायुक्त पंकजजी शिरसाट यांनी आर एस पी अधिकारी शिक्षक सहविचार सभे मध्ये बोलताना सांगितले.

ठाणे शहर वाहतूक पोलिस उपायुक्त पंकजजी शिरसाट यांचा अध्यक्षतेखाली सहायक वाहतूक पोलिस उपायुक्त भोसले, वरिष्ठ वाहतूक पोलीस निरीक्षक राजेंद्र शिरसाट, विभागीय समादेशक दिलीप स्वामी, विभागीय समादेशक डॉ. मनिलाल शिंपी, समाजसेवक, आर एस पी जिल्हा मार्गदर्शक माणिक पाटील, कल्याण डोंबिवली जिल्हा समादेशक अनंत किनगे यांचा उपस्थितीत ठाणे शहर वाहतूक पोलिस उपायुक्तालय कार्यालयात आर एस पी अधिकारी शिक्षक युनिट ची २०२५/२०२६ या शैक्षणिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमावर सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी ठाणे जिल्हा अतिरिक्त समादेशक जितेंद्र सोनवणे, कळवा मुंब्रा समादेशक संजय खैरनार, डोंबिवली समादेश किरण वसईकर,उल्हासनगर समादेशक संतोष गोरडे, ठाणे शहर समादेशक बाळा साठे, आर एस पी अधिकारी शिक्षक गोकुळ गवळी, संग्रामसिंह राजपूत, मॉडेल कॉलेजचे प्रा.सुभाष गायकवाड, काशिनाथ गोसावी, ठाणे शहरातील सतीश पाटील, तुकाराम खाटघरे, सुब्रमण्यम, प्रा.दयानंद कांबळे, प्रा.विशाल सोनवणे, गोपाळ राव डिक्कुला, योगेश अहिरे, निवृत मुख्याध्यापक विजय भामरे, सम्राट अशोक विद्यालयाचे ओमप्रकाश धनविजय, गायत्री विद्यालयाचे भीमराव भालेराव, वाशी येथील यशवंत पवार यांच्यासह सर्व आर एस पी अधिकारी शिक्षक सभेला उपस्थिती होते. वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र शिरसाठ यांनी आभार मानले.

महाराष्ट्र शासन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शहापूर यांचे कार्यालय**

दुरध्वनी क्र. : ०२५२७-२७२०६८ फॅक्स क्र : ०२५२७-२७२०६८ ई-मेल : 135 shahapurst@gmail.com

**जाहिर नोटीस**

प्रति
श्री. संतोष विठ्ठल घरत
रा. कासगांव पो. धसई ता. शहापूर जि. ठाणे **अर्जदार**

**विरुध्द**

निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग,
जन्म/मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी नगर पंचायत,
शहापूर, ग्रामपंचायत शेलवली ख ता. शहापूर जि.ठाणे **सामनेवाले**

**जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १३ नुसार**

तमाम जनतेस सदर नोटीसोद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणेः

1. उपरोक्त अर्जदार श्री. संतोष विठ्ठल घरत यांचा स्वतःचा जन्म दिनांक. 09/04/1972 रोजी मौजे कासगांव ता. शहापूर, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर नोंद निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, जन्म/मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी नगर पंचायत शहापूर व पंचायत शेलवली ख यांचे दफ्तरी करुन दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता, अर्जदार यांना कायदेशीर कामा करीता त्यांच्या स्वतःचे दाखल्याची आवश्यकता आहे.
2. उशीरा जन्म नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी शहापूर यांचेकडून आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज दि. 29/04/2025 रोजी दाखल केला आहे.
3. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसाच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना या कार्यालयातर्फे त्यांच्या आजी / आजोबा/ आई/वडील / मुलगा / मुलगी /नातु/ भाऊ / बहिण /यांचा जन्म / मृत्यु नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे 10/6/2025 रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

सही /-
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी,
शहापूर करीता

जा.क्र. महसूल/एमएजी/मृत्यू नोंद सुनावणी/एस आर- /२०२५
दिनांक : १०/६/२०२५

# केडीएमसी आयुक्तांनी केली विविध विकासकामांची पाहणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील विजयनगर – गवळी नगर प्रभागातील विविध प्रलंबित विकासकामांची नुकतीच पाहणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी केली. या पाहणीवेळी महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी शिवसेना कल्याण पूर्व विधानसभा क्षेत्रप्रमुख प्रशांत काळे व माजी नगरसेविका माधुरी काळे, उपस्थित होते.

या सदर दौऱ्यात आमराई, विजयनगर परिसरातील रस्ते, नाले, पथदिवे, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, गटारे अशा अनेक कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. कामांबाबत सविस्तर आढावा घेत आयुक्त गोयल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना प्रलंबित विकासकामे तातडीने युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. तसेच, आतापर्यंत पूर्ण झालेल्या कामांची माहिती अहवालाद्वारे सादर करावी अशी सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिली. नागरिकांच्या मागण्या आणि परिसरातील समस्या लक्षात घेऊन महापालिकेच्या पातळीवर त्वरित कृती केली जाणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या दौऱ्यामुळे विजयनगर – गवळी नगर परिसरातील विकासकामांना नवी गती मिळणार असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेली कामे लवकरच पूर्णत्वास जाणार असल्याची आशा नागरिकांनी व्यक्त केली आहे. या दौऱ्याने प्रशासन आणि नागरिक यांच्यातील विश्वासात वृद्धी होणार असून, माजी नगरसेविका माधुरी काळे यांनी नागरिकांच्या प्रश्नांना महापालिकेकडे वेळोवेळी गांभीर्याने मांडल्यामुळे हा पुढाकार महत्त्वाचा ठरत आहे.

# भिवंडी महापालिकेने वाढीव मालमत्ता कर रद्द करावा

## शिवसेनेची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहर महानगरपालिका आयुक्त प्रशासनाने लोकप्रतिनिधी व सर्व सामान्य नागरिकांना विश्वासात न घेता घरपट्टी व पाणीपट्टी मालमत्ता करात मनमर्जी करून मोठया प्रमाणात वाढ केली आहे त्यामुळे सर्व सामान्य नागरिकांचे अर्थिक बजेट कोसळल्याने महिला व नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट आहे.त्यामुळे आयुक्तांनी लोकभावनेचा आदर करून मालमत्ता कर वाढ तात्काळ कमी करावी अशी मागणी भिवंडी महापालिकेचे शिवसेनेचे माजी उपमहापौर जेष्ठ नगरसेवक मनोज काटेकर यांनी केली.

याबाबत मनोज काटेकर यांनी आयुक्त अनमोल सागर यांची भेट घेऊन लेखी निवेदन पत्र दिले आहे भिवंडी महापालिका कार्यक्षेत्राततील रहिवासी नागरिकांना सन २०२५-२६ मध्ये मालमत्ता कर भरण्यासाठी जी बिल देण्यात आलेली आहे त्यात जल लाभ कर व मल लाभ कर यामध्ये रहिवासी क्षेत्राला १५% टक्के वाढीव व व्यावसायिक क्षेत्राला २३ % टक्के वाढ करण्यात आलेली आहे. त्यामुळे नागरिकां मध्ये मध्ये तीव्र नाराजी व संताप व्यक्त केला जात आहे.पालिकेकडे नियमित घरपट्टी व पाणीपट्टी भरणाऱ्या नागरिक किंवा मुदतीत भरणाऱ्या नागरिक या



प्रकारामुळे त्रस्त झाले आहे. भिवंडी शहरामध्ये अनेक लोक महापालिकेला कर (टॅक्स) भरत नाहीत. त्यामुळे पालिकेचे मोठे नुकसान होत आहे,त्यामुळे विकास कामांवर सुध्दा मोठा परिणाम होत असतो त्यामुळे आयुक्त प्रशासनाचेवतीने मालमत्ता थकबाकी करणाऱ्या करदात्या कडून कर वसूल करण्यासाठी दरवर्षी जानेवारी,फेब्रुवारी व मार्चमध्ये मालमत्ता करावर व्याज माफीची सवलत देत असतो. त्यामुळे नियमित कर (टॅक्स) भरणाऱ्या लोकांवर नकळत अन्याय होत असतो,त्यामुळे महापालिकेच्या क्षेत्रातील सर्व मालमत्ताचे जी.पी.एस.सर्व्हे करुन प्रत्येक मालमत्ताचं मोजमाप करुन घेतल्यास महापालिकेला वार्षिक ७.५० ते ८ कोटीचा घरपट्टी व पाणीपट्टी उत्पन्नात वाढ होऊ शकते. त्यामुळे अनेक इमारत, घर व इतर मालमत्तांची कर आकारणी झाली आहे का,तसेच मालमत्ता कर कमी व जास्त प्रमाणात होत असल्याचे उघड होईल व वार्षिक मालमत्ता उत्पन्नाचे स्रोत वाढ होईल असे मत उपमहापौर काटेकर यांनी व्यक्त केले आहे.व्यावसायिक क्षेत्रासाठी २३ % टक्के जल लाभ कर व मल लाभ कर लावलेला आहे त्यामुळे व्यावसायिक नाराज झाले आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारचा सुविधा मिळत नाहीत असे असताना मालमत्ता कर वाढ करून न कळत शिक्षा देण्याचा प्रकार नकळत पालिकेकडून होत आहे सध्या विविध व्यवसाय मंदीच्या छायेत आहेत असे असताना अचानक कर वाढ झाल्याने व्यापारी त्रस्त झाले आहेत.त्यामुळे रहिवासी व व्यावसायिकावर लावण्यात आलेला कर वाढ तातडीने रद्द करावी अशी मागणी माजी उपमहापौर मनोज काटेकर यांनी केली आहे.

# शिक्षकांसह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी

## शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या कामाचा धडाका सुरू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातील शिक्षकांच्या प्रलंबित समस्या सोडविण्याकरिता कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांची शिक्षण उपसंचालक कार्यालय मुंबई येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये तीन जिल्ह्यातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेली कामे धडाकेबाज कामाने मार्गी लावली. त्याबद्दल शिक्षक आमदारांचे कर्मचाऱ्यांनी आभार व्यक्त करून समाधान मानले आहे. शिक्षण उपसंचालक कार्यालय तसेच जिल्हा परिषदेच्या कार्यालयात कर्मचाऱ्यांच्या फायली हलणे खूप दुरापास्त झाले आहे .परंतु शिक्षक आमदार स्वतः जातीने या कामात लक्ष देत असल्यामुळे आता कामाचा निपटारा हा जलद गतीने होत आहे .त्याबद्दल शिक्षकांनी समाधान व्यक्त केले आहे.

ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक समस्या शिक्षण उपसंचालक कार्यालय मुंबई येथे प्रलंबित होत्या. या समस्या सोडवण्याकरिता कोकण विभागाचे शिक्षक आमदार मा. ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांनी शिक्षण उपसंचालक मा. संदीप संगवे साहेब व सहायक शिक्षण संचालक मा. सुनील सावंत साहेब आणि त्यांच्या कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांच्या समवेत ठाणे पालघर आणि रायगड जिल्ह्यातील प्रलंबित असलेल्या विविध शैक्षणिक समस्या मांडल्या आणि त्या सोडवण्याकरिता तात्काळ कारवाई करावी असे निर्देशित केले.

यामध्ये ठाणे जिल्ह्यातील देविदास मधुकर सुरोशे शाळा विद्यामंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय शिवले तालुका मुरबाड जिल्हा ठाणे अनुकंपा नियुक्त लिपिक यांना शालार्थ प्रणाली मध्ये नाव समाविष्ट करून देण्यात आले. श्री नवनीत पाटील अनुकंपा नियुक्त छत्रपती शिवाजी हायस्कूल व दि बा पाटील जुनिअर कॉलेज जासई तालुका उरण जिल्हा रायगड यांचे देखील शालार्थ प्रणाली मध्ये नाव समाविष्ट करण्यात आले. मृणालिनी रंगराव कांबळे अनुकंपा नियुक्त कनिष्ठ लिपिक न्यू इंग्लिश स्कूल कोकबन जिल्हा रायगड यांचे देखील शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करून देण्यात आले. सुमित वर्धराज हेरकर सरस्वती विद्यालय चेंबूर मुंबई यांचे देखील शालार्थ प्रणाली मध्ये नाव समाविष्ट करण्यात आले. गायत्री विद्यालय अंबरनाथ जिल्हा ठाणे या शाळेस स्थलांतरणाकरिता शिफारस देण्यात आली.नंदा प्रशांत पाटील प्रतिमा हायस्कूल तालुका अंबरनाथ जिल्हा ठाणे यांचे देखील शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करून देण्यात आले.

अशाप्रकारे अनेक कामे मार्गी लागलेली असून उर्वरित प्रलंबित कामे देखील लवकरात लवकर सोडविले जातील असे शिक्षण उपसंचालक मा. संदीप संगवे साहेब यांनी आश्वासित केले. शिक्षकांचे आमदार शिक्षक असल्यामुळे अनेक शिक्षकांच्या समस्या कमी वेळेमध्ये अगदी तात्काळ सोडविल्या जात असल्याने शिक्षकांच्या चेहऱ्यावर आनंद होता, वरील दिलेल्या सर्व मान्यता ह्या अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती असल्याने खऱ्या अर्थाने ज्यांच्या कुटुंबातील करता कमावता व्यक्ती गेलेली होती अशा कुटुंबला न्याय देण्याचे काम व वारसांना नोकरी उपलब्ध करून त्यांना मान्यता देण्याचे व त्यांचे पगार सुरू करण्याचे पवित्र कार्य आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे सर करत आहेत आणि तेच खरे अनुकंपाचे व शिक्षकांचे कैवारी आहेत हे सिद्ध होत असल्याचे मत महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटना अध्यक्ष कोकण विभाग अध्यक्ष प्रशांत भामरे यांनी व्यक्त केले आहे.

# मांडा-टिटवाळा येथे शासकीय दाखले वाटप शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : भारतीय जनता पक्षाच्या मांडा-टिटवाळा व कल्याण तहसीलदार कायौलय यांच्या सयुक्तिक विधमाने परिसरातील शाळेय विध्यार्थ्यांना व नागरिकांसाठी मोफत शासकीय दाखले वाटप शिबीराचे आयोजन माजी उपमहापौर उपेक्षा भोईर व भाजपचे



टिटवाळा मंडळाचे अध्यक्ष शक्तीवान भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली विधा मंदिर मांडा टिटवाळा येथील शाळेत करण्यात आले होते, शिबीरा मध्ये स्थानिक वास्तव दाखला, उत्पन्न दाखला, डोमासाईल दाखले इत्यादी दाखले अजै भरून घेण्यात आले, मांडा टिटवाळा परिसरातील असंख्य नागरिकांनी दाखले वाटप शिबीराचा लाभ घेतला,यावेळी भाजपचे मांडा टिटवाळा मंडळाचे अध्यक्ष शक्तीवान भोईर यांनी सांगितले की शाळेय तसेच महाविद्यालयान विध्यार्थी व नागरिकांना विविध प्रकारच्या दाखल्याची आवश्यकता असते, दाखले काढण्यासाठी कल्याण तहसीलदार कायौलयात जावे लागते वेळ हि लागतो व फेऱ्या माराव्या लागतात हया सवै बाबींचा विचार करून व नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून दाखले वाटप शिबीराचे आयोजन केले होते,यावेळी माजी उपमहापौर उपेक्षा भोईर, विवेक पुरवणीक,परेश गुजरे,दिपक कांबळे, गजानन मढवी, संतोष शिंगोले, हेमंत गायकवाड, शिवाजी माने,अजित चव्हाण, अनिरुद्ध राणे,किरण पाटील, बिज्रेश पांडे, राम चव्हाण, शैलेश गिरी,कस्तूभ गुजरे,महेश जाधव, रामचंद्र कोल्हारे,वैशाली पाटील, यामिनी चव्हाण, प्रभा नरसिंह, यशोदा पाटील, तसेच तलाठी किरण कदम,राहुल दांडगे,मंजुषा राठोड, संपदा सावंत, महासेवा केंद्राचे रवी चौधरी, रजपूत सर,विशाल जाधव उपस्थित होते.




राजे संस्कार प्रतिष्ठानकडून

# गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : पुस्तकासारखा मित्र नाही, ग्रंथासारखा गुरु नाही, गुरूंनी ठरवलं तर या जगात काहीच अशक्य नाही. सलग 2 वर्ष त्रंबकेश्वर तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवलेल्या जिल्हा परिषद शाळेला नुकतीच राजे संस्कार प्रतिष्ठानने भेट देऊन त्यांच्या मागणीला प्रतिसाद दिला.

पुलाचिवाडी, ता. त्र्यंबकेश्वर, नाशिक येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या अतिशय गुणवंत परंतु आर्थिक परिस्थिती कमकुवत असलेल्या विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शाळेच्या मागणीनुसार प्रा. संभाजी शेळके यांच्या राजे संस्कार प्रतिष्ठानने आपल्या मावळयांसोबत गुरुवार दि १२ जून २०२५ रोजी हजेरी लावली. तेथील पहिली ते चौथीच्या 50 विद्यार्थ्यांना दप्तर आणि लेखन साहित्याचे वाटप केले.यामुळे विध्यार्थ्यांच्या चेहेऱ्यावरचा आनंद द्विगुणित झाला होता. यात आनंद शिंदे, मृदुला शिंदे व संजय इधे यांचा सहभाग होता.

या उपक्रमाला प्रा. संभाजी शेळके यांची नेहमीप्रमाणे समाजाप्रती तळमळ जाणवली. आपल्या शैक्षणिक साम्राज्यातून वेळात वेळ काढून साद मिळेल तिथे प्रतिसाद यंदाही दिला. या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह गुरुजनवर्ग, मुख्याध्यापक,आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024